महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. DGP-D१६०२९ / २ / २०२३- DESK १६ (ई-५६८७७) मुंबई, दिनांक:-११/०९/२०२६.

**विषय** :- राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद-५८ वी सभा.

******

५८ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद सभा, **मंगळवार, दि.२१/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा. पोलीस महासंचालक यांचे अध्यक्षतेखाली पोलीस मुख्यालयातील तळ मजल्यावरील मुख्य सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये ५७ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमधील १६ मुद्यांचा आढावा व ५८ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी उपस्थित केलेले नवीन ११ मुद्दे तसेच आयत्यावेळी उपस्थित केलेले ०९ मुद्दे असे एकूण ३६ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा कार्यवृत्तांत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर कार्यवृत्तांत सर्व पोलीस अधिकारी / अंमलदारांच्या निदर्शनास आणण्यासाठी मुख्यालयाच्या व पोलीस ठाण्यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावा. त्याचबरोबर, ह्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय घटकांच्या पोलीस राजपत्रांमध्ये प्रसिध्द करावेत. तसेच, ह्या कार्यवृत्तांताच्या प्रती त्यांच्या आस्थापनेवरील सदस्यांना देऊन, त्याबाबत त्यांचे काही म्हणणे (Say /Opinions) असल्यास, ते एक महिन्याच्या आत या कार्यालयास कळविण्याविषयी व या मुदतीत त्यांचे म्हणणे या कार्यालयास प्राप्त झाले नाही, तर सदर कार्यवृत्तांत त्यांना मान्य असल्याचे गृहित धरले जाईल, असेही कृपया त्यांना सूचित करावे.

**(मा. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांचे मान्यतेने)**

( अभिषेक त्रिमुखे )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

**प्रति,**

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक / वाहतूक / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / रा.रा.पो.बल / प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळणवळण व परिवहन विभाग, म.राज्य, पुणे.

कृ.मा.प.

Scanned with OKEN Scanner

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, सायबर, म. राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / नागरी हक्क संरक्षण / विशेष कृती, म. राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह व बृहन्मुंबई वगळून)
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा / फोर्स वन / ( प्रशिक्षण व खास पथके) / आस्थापना / (कायदा व सुव्यवस्था) / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग/ नि. व स./ सागरी सुरक्षा, म. राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग / अंमली पदार्थ विरोधी पथक, टास्क फोर्स, म. राज्य, पुणे.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता विभाग प्रबोधिनी, पुणे.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुरावर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक / अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते २०.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,**

सर्व संबंधित कार्यासन अधिकारी, पोमसं कार्यालय, म. राज्य, मुंबई.

२/- यांनी कार्यवृत्तांतामधील त्यांच्या कार्यासनाशी संबंधित ज्या मुद्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे ती कार्यवाही संबंधित वरिष्ठ अधिका-यांच्या मान्यतेने विनाविलंब करावी व पूर्तता अहवाल त्वरीत कार्यासन क्रमांक १६ यांचेकडे पाठवावे.

**प्रत माहितीसाठी :-**

सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स), / विशेष कृती / दक्षता / कायदा व सुव्यवस्था, म. राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उपसहायक व उपसहायक.
पोलीस निरीक्षक, संगणक कक्ष, म. राज्य, मुंबई.

**प्रत,**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक.
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक

Scanned with OKEN Scanner

## सदर बैठकीचे कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे:-

५८ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभेसाठी सर्व उपस्थितांचे मा. अध्यक्ष महोदय यांच्या वतीने पदसिध्द सचिव तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वागत केले. मा. अध्यक्ष यांना ५८ व्या सभेकरिता सुरूवात करण्याची अनुमती घेवून सभेकरिता उपस्थित करण्यात आलेले मुद्दे वाचण्याकामी श्री. अभिषेक त्रिमुखे, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी ५७ व्या सभेतील प्रलंबित १६ मुद्दे व ५८ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद बैठकीमध्ये चर्चेकरिता उपस्थित करण्यात आलेल्या नवीन मुद्दयांवर चर्चा सुरू केली.

सदर सभेमध्ये राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या ५७ व्या सभेमधील ०६ मुद्दे, ५७ व्या सभेतील सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले नविन १० तसेच ५८ व्या सभेतील सभासदांनी उपस्थित केलेले नवीन ११ मुद्दे व आयत्यावेळी उपस्थित केलेले ०९ असे एकूण ३६ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. सदर मुद्यांपैकी ०८ मुद्दे निकाली तर ०१ मुद्दा अमान्य करण्यात आला आहे व उर्वरित २७ मुद्यांवर कार्यवाहीचे निर्देश दिले.

मा. अध्यक्षांनी असे निर्देश दिले की, कार्यासन अधिकारी यांनी त्यांचेशी संबंधित मुद्यांची पुर्तता करून केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित वरिष्ठ अधिका-यांच्या मान्यतेने कार्यासन क्रमांक १६ यांचेकडे द्यावी. त्यानंतर मा. अध्यक्षांनी सर्वांना धन्यवाद दिले व मा. अध्यक्षांच्या वतीने पदसिध्द सचिव तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ५८ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद सभा संपन्न झाली, असे जाहीर केले.

******

Scanned with OKEN Scanner

५८ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा मंगळवार, दि.२१/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. पोलीस महासंचालक यांचे अध्यक्षतेखाली पोलीस मुख्यालयातील तळ मजल्यावरील मुख्य सभागृहामध्ये घेण्यात आली. सदर सभेमध्ये खालील पोलीस अधिकारी व अंमलदार / मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते:-

| अ.क्र. | नाव व पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | पदसिध्द अध्यक्ष |
| २. | डॉ. निखील गुप्ता, अपर पोलीस महासंचालक (का. व .सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ३. | श्री. मधूकर पाण्डेय, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ४. | श्री. राजकुमार व्हटकर, अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ५. | श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ६. | श्री. शिरीष जैन, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ७. | श्रीमती अश्वती दोरजे, अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ८. | श्री. छेरिंग दारजे, अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ९. | श्रीमती सुप्रिया पाटील-यादव, विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| १०. | श्री. रामनाथ पोकळे, विशेष पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| ११. | श्री. सोमनाथ घार्गे, सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| १२. | श्री. श्रवण दत्त, सहायक पोलीस महानिरीक्षक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| १३. | श्री. सुहास बावचे, सहायक पोलीस महानिरीक्षक (दक्षता), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| १४. | श्री. सागर पाटील, सहायक पोलीस महानिरीक्षक (का. व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | -- |
| १५. | श्री. विजय खरात, पोलीस उप आयुक्त, पो.आ., नवी मुंबई. | सभासद |
| १६. | श्री. सुधाकर यादव, पोलीस उप विभागीय अधिकारी, पो.आ., पिंपरी चिंचवड. | सभासद |
| १७. | श्री. सलीम अमर चाऊस, पोलीस निरीक्षक, पो.अ., छत्रपती संभाजीनगर. | सभासद |
| १८. | श्री. राजेश रमेश भागवत, पोलीस निरीक्षक, संचालक व वि.पो.म.नि., म.गु.प्र., पुणे. | सभासद |
| १९. | श्रीमती ज्योत्स्ना गिरी, पोलीस उप निरीक्षक, पो.अ., नागपूर ग्रामीण. | सभासद |
| २०. | श्री. विनोद गजानन भुरले, पोलीस उप निरीक्षक, पो.अ., चंद्रपूर. | सभासद |
| २१. | श्री. दत्तात्रय चंद्रकांत पवार, पोलीस उप निरीक्षक, वि.पो.म.नि., मो.प.वि., पुणे. | सभासद |
| २२. | श्री. विक्रांत राजेंद्र संकपाळ, पोलीस निरीक्षक (ए.टी.प.), पो.अ., सांगली. | सभासद |
| २३. | श्री. नईम खान मौनोद्दीन खान, सहा. पोलीस उप निरीक्षक, पो.अ., नांदेड | सभासद |
| २४. | श्री. पंकज पवनलाल पांडेय, पोहवा/९५५, पो.अ., गोंदिया. | सभासद |
| २५. | श्री. गजानन घनश्याम डुरे, पोहवा/१४२, पो.अ., हिंगोली. | सभासद |
| २६. | श्री. सचिन पवार, पोहवा/२०५९, पो.अ., पुणे ग्रामीण. | सभासद |
| २७. | श्री. प्रमोद बाळकृष्ण काळसेकर, पोहवा/९८, पो.अ., सिंधूदुर्ग. | सभासद |
| २८. | श्री. सचिन बाबुराव पोवार, असई, पो.आ., पुणे शहर. | सभासद |
| २९. | श्रीमती मीना गौतम पातोडे/ प्रधान, मपोहवा/१९११, पो.अ., छत्रपती संभाजीनगर. | सभासद |
| ३०. | श्रीमती मयुरी नंदागवळी, पोलीस शिपाई, पो.अ., भंडारा. | सभासद |
| ३१. | श्री. संतोष नामदेव वाघ, पोशि/१०३१, पो.अ., वाशिम. | सभासद |
| ३२. | श्री. गणेश शिंदे, पोशि/३३१, पो.अ., धाराशीव. | सभासद |
| ३३. | श्री. डी. बी. केंद्रे, पोशि /४८८, पो.अ., लोहमार्ग पुणे. | सभासद |
| ३४. | श्री. गणेश गोविंद पाटील, सपोशि/१०४७, रा.रा.पो.बल, गट क्र.११, नवी मुंबई. | सभासद |

Scanned with OKEN Scanner

# राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषद- ५८ वी सभा

# मंगळवार, दिनांक:- २१ जुलै, २०२६

## ५७ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा ( नवीन मुद्दे )

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा/९५५, श्री. पंकज पांडे, नेम. पोलीस मुख्यालय गोंदिया | मोबाईल भत्ता प्रत्येक महिन्यात रु. ३००/- प्रमाणे मिळणेबाबत. | तपासी अधिकारी यांनी प्रतिमहा रु. ५०० मोबाईल भत्ता देणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असुन, सदर प्रस्ताव शासनाकडून अद्यापपर्यत मंजूरी प्राप्त झालेली नाही. शासनाकडून मंजूरी प्राप्त होताच अंमलबजावणी करण्यात येईल. | कार्यासन क्रमांक- ३०<br>या कार्यालयातील कार्यासन क्रमांक १७-अ कडून, दि.२३/०६/२०२६ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, सदर प्रस्तावास शासनाकडून अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही.<br>तसेच अनुदान / भत्ता देण्याबाबतचा विषय हा कार्यासन क्रमांक ३० कडून हाताळण्यात येत असल्याने सदरची मुळ नस्ती पुढील कार्यवाहीसाठी दि.१०/०७/२०२६ रोजी कार्यासन क्रमांक ३० यांना वर्ग करण्यात आली आहे. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई :-**<br>शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, सदर प्रस्तावास शासनाकडून अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही. सदर प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करावा. |
| २ | पोहवा/९५५, श्री. पंकज पांडे, नेम. पोलीस मुख्यालय गोंदिया | सेवानिवृत्तीच्यावेळी वैद्यकीय रजेचे २०० दिवसाचे रोखीकरण म्हणून रक्कम मिळणेबाबत. | **कार्यासन क्रमांक-३० यांनी सदर प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.** | कार्यासन क्रमांक-३०<br>सदरबाबत सेवानिवृत्तीच्यावेळी वैद्यकीय रजेचे २०० दिवसाचे रोखीकरण म्हणून रक्कम मिळणेबाबत या कार्यालयाचे दि.१३/०३/२०२६ अन्वये, पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचेकडून शासनास प्रस्ताव पाठविण्यकारीता मागविण्यात आलेला आहे. परंतु प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई :-**<br>वैद्यकीय रजा ही आजारी पडल्यावर उपभोगण्यात येते. परंतु आजारी पडलो नाही म्हणून त्या रजेचे रोखीकरण मिळावे या मागणीत तर्कशुद्धता दिसून येत नाही.<br>जर रजा रोखीकरण करतेवेळी अर्जित रजा कमी असतील तर वैद्यकीय रजा जोडून पूर्ण रजेचे रोखीकरण करण्यात येते का, हे तपासून अभिप्राय द्यावेत. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ३ | पोहवा/९५५, श्री. पंकज पांडे, नेम. पोलीस मुख्यालय गोंदिया | प्रवास भत्ता रु.१००/- असुन ते प्रवास भत्ता रु. ३००/- मिळणेबाबत. | **कार्यासन क्रमांक-३० सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.** | कार्यासन क्रमांक-३०<br>शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र. २/सेवा-५, दि.०३/०३/२०१० नुसार कर्मचा-याने शासकीय विश्रामगृहात वास्तव्य केल्यास /स्वत: राहण्याची अन्य व्यवस्था केल्यास मंजूर करावयाचे दैनिक भत्त्याचे सुधारीत दर सदरहु शासन निर्णयानुसार **विवरणपत्रात** नमूद केल्यानुसार निर्धारित करण्यात आलेले आहेत.<br>तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी / अंमलदार यांना देय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात तिपटीने वाढ करण्याबाबत या कार्यालयाचे दि.०४/०२/२०२२ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. (प्रत संलग्न) तसेच, याबाबत दि.१६/०६/२०२२, ०८/०४/२०२४, २४/०७/२०२४, ३१/१०/२०२४, ०४/१२/२०२४, ०४/०२/२०२५ व ३०/०६/२०२६ च्या पत्रान्वये शासनास स्मरणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे. तथापि, याबाबतचे शासन आदेश अद्याप अप्राप्त आहेत. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई :-**<br>**शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, सदर प्रस्तावास शासनाकडून अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही. सदर प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करावा.** |
| ४ | पोलीस अधीक्षक, धाराशिव | जे पोलीस खेळाडू महाराष्ट्र संघात राज्यस्तराव व राष्ट्रीय स्तरावर खेळ खेळतात त्या खेळाडुसाठी लागणारे साहित्यासाठी पोलीस कल्याण निधीमधून निधी मंजूर करणेबाबत. | **सदरबाबत घटक कार्यालयांना ५ लाखापेक्षा अधिक रकमेची आवश्यकता असल्यास तसा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करावा.** | सदर मुद्दा निकाली निघाला आहे. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई :-**<br>एक परिपत्रक निर्गमित करावे. त्यात राज्य आणि राष्ट्र स्तरीय Events स्पष्टपणे नमूद करावे. खेळाडूंसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च ५ लाखापर्यंत असल्यास संबंधित घटकाकडून भागविण्यात येतो. परंतु ५ लाखापेक्षा अधिकचा खर्च असल्यास (खाजगी |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | Events वगळून) तसा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करण्याबाबत कळवावे. |
| ५ | पोलीस अधीक्षक, सातारा | प्रस्तावित सातारा पोलीस पब्लीक स्कुल ही शाळा सातारा पोलीस दलाचे मालकीच्या मौजे म्हसवे ता. जि. सातारा येथील गट नं ८८ क्षेत्र ३७२०० चौ. फु. या जागेत बांधकाम करण्याचे व नमूद शाळा स्थलांतरीत करण्याचे परवानगी मिळणेबाबत. | **पोलीस अधीक्षक, सातारा यांचेकडून सुधारीत प्रस्ताव प्राप्त होताच शासनासकडे मंजुरीकरीता सादर करण्यात येईल.** | **कार्यासन क्रमांक -२८अे**<br>पोलीस अधीक्षक, सातारा यांचेकडून अद्याप सुधारीत प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई :-**<br>पोलीस अधीक्षक, सातारा यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात यावा. सदरचा खर्च पोलीस कल्याण निधीमधून भागविता येईल का याबाबत विचार करण्यात यावा. |
| ६ | सभासद सपोउपनि नईम खान मैनोदिन खान, बॅच नं ५२९७, नांदेड जि. पोलीस दल | पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभागात ज्या प्रमाणे परिक्षेत्राअंतर्गत पोलीस अंमलदाराचे नेमणुकीचे अधिकार व कार्यालयीन खर्चाचे अधिकार बहाल करण्यात आले आहे. त्याप्रमाणे त्या धर्तीवर परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक नागरी हक्क संरक्षण विभाग यांना अधिकार बहाल करण्यात यावे ही विनंती. | **अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण यांनी परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक, नागरी हक्क सरंक्षण विभाग यांच्या आस्थापनेवर किती आहरण व संवितरण अधिकारी (DDO) व मनुष्यबळ मंजूर आहे. याबाबत तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.** | **कार्यासन क्रमांक ४१:-**<br>या कार्यालयाच्या आस्थापनेवर व अधिपत्याखालील परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक, नाहसं, कार्यालयांकरीता आकृतीबंधानुसार मंजूर असलेल्या संख्याबळाचे विवरणपत्र यासोबत सादर करण्यात येत आहे. तसेच पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांनी क्र.पोमसं/२६ब/मनुष्यबळ वाढ/प्रस्ताव/५४/२०१३ दि.१५/०७/२०१६ च्या ज्ञापान्वये परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक, नाहसं कार्यालयाकरीता पोलीस अंमलदारांची अतिरिक्त १४६ पदे वर्ग केली आहेत. (प्रत संलग्न)<br>त्याचप्रमाणे, नाहसं, विभागातील पोलीस अंमलदारांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुका हया शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार या | **मुद्दा अमान्य**<br>अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, म. राज्य, मुंबई यांनी परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण विभाग यांच्या आस्थापनेवर इतर विभागाच्या मानाने फारच कमी प्रमाणात संख्याबळ मंजूर असल्याने त्यांना पोलीस अंमलदारांचे नेमणुकीचे व कार्यालयीन खर्चाचे अधिकार प्रदान करण्याची आवश्यकता वाटत नाही. असे मत व्यक्त केले. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यालयाकडुन करण्यात येतात. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवर एकही आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांचे पद मंजूर नाही. नागरी हक्क संरक्षण, परिक्षेत्रांतर्गत कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वेतन व भत्ते, तसेच इतर सेवाविषयक बाबी हया संबंधीत परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयांमार्फत हाताळण्यात येतात.<br>उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता परिक्षेत्रीय पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण विभाग यांच्या आस्थापनेवर इतर विभागाच्या मानाने फारच कमी प्रमाणात संख्याबळ मंजूर असल्याने त्यांना पोलीस अंमलदारांचे नेमणुकीचे व कार्यालयीन खर्चाचे अधिकार प्रदान करण्याची आवश्यकता वाटत नाही. | |

***

## ५७ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा ( आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे )

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस उप निरीक्षक / दत्तात्रय चंद्रकात पवार, मो.प. चालक प्रशिक्षण शाळा, पुणे. | अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांचे अधिपत्याखालील पोलीस चालक प्रशिक्षण शाळा, पुणे संस्था असून दिनांक 30 एप्रिल 1956 पासून कार्यरत आहे. या प्रशिक्षण संस्थमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या विविध घटकातील अंमलदारांना वाहन चालवण्यिाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच सेवेत नवनियुक्त पोलीस उपअधीक्षक, मोटार परीवहन, पोलीस उपनिरीक्षक, मोटार परीवहन आणि तांत्रिक अंमलदारांना सुध्दा मुलभूत प्रशिक्षण देण्यात येते.अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांच्या | **अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे -**<br>अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांचे अधिपत्याखालील चालक प्रशिक्षण शाळा पुणे संस्था दि.३०/०४/१९५६ पासुन कार्यरत आहे. या प्रशिक्षण संस्थेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या विविध घटकांतील अंमलदारांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच सेवेत नवनियुक्त पोलीस उपअधीक्षक, मोटार परिवहन आणि तांत्रिक अंमलदारांना सुध्दा मुलभूत प्रशिक्षण देण्यात येते अपर पोलीस महासंचालक / संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन, पुणे यांच्या अधिपत्याखालील बिनतारी संदेश विभागातील कर्मचा-यांकरिता असलेली प्रशिक्षण संस्थेस शिखर संस्थेचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर अपर पोलीस महासंचालक / संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन, पुणे यांच्या अधिपत्याखालील मोटार परिवहन विभागातील पोलीस चालक प्रशिक्षण शाळा पुणे या शिक्षण संस्थेस शिखर संस्थेचा दर्जा मिळावा व २४ टक्के प्रोत्साहन भत्ता प्रशिक्षण संस्थेकरिता मिळणेबाबतचा प्रस्ताव जा. क्र.चालक प्रशिक्षण शाळा / प्रशिक्षण भत्ता/२०२६, दि.१४/०५/२०२६ अन्वये अहवाल सादर केला आहे. | **१. अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे व २. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.** |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | अधिपत्याखालील बिनतारी संदेश विभागातील कर्मचाऱ्यांकरिता असलेली प्रशिक्षण संस्थेस शिखर संस्थेचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांच्या अधिपत्याखालील मोटार परिवहन विभागातील पोलीस चालक प्रशिक्षण शाळा, पुणे या संस्थेस शिखर संस्थेचा दर्जा मिळवा. | | **अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई :-**<br>अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांचे दि.१४/०५/२०२६ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्तवा शासनास सादर करणेकामी या कार्यालयास पाठविण्यात आला होता. तथापि, अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे (बिनतारी संदेश पुणे) ही महाराष्ट्र पोलीस दलाची शिखर प्रशिक्षण संस्था असल्याने तसेच मोटार परिवहन विभागातील पोलीस चालक प्रशिक्षण शाळा, पुणे या संस्थेचे विभाग प्रमुख असल्याने सदरचा प्रस्ताव शासनास / पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्याकरिता सक्षम प्राधिकारी आहेत. यास्तव सदरचा प्रस्ताव परस्पर अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे कार्यालयाच्या स्तरावरून पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्याबाबत या कार्यालयाचे दि.०६/०७/२०२६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. | |
| २. | पोलीस उप निरीक्षक / दत्तात्रय चंद्रकात पवार, मो.प. चालक प्रशिक्षण शाळा, पुणे. | अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण पुणे व विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे या दोन्ही कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत पोलीस अधिकारी व | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **कार्यासन क्रमांक- २६-ब**<br>अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य, पुणे यांचे क्र. प्रशासन/३-अ/पोलीस प्राथमिक आरोग्य केंद्र/ २९८१/२०२५, दि.१५/१०/२०२५ च्या पत्रान्वये त्यांचे आस्थापनेवर प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आली होती. सदरची मूळ | **अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म. राज्य, मुंबई** यांनी सविस्तर प्रस्ताव सादर करावा. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | अंमलदार यांना पोलीस रुग्णालयाची सोय नाही. तसेच दोन्ही कार्यालयात प्रशिक्षण सत्र चालत असून प्रशिक्षण काळात काही गंभीर घटना / अपघात घडल्यास अतितात्काळ वैद्यकीय सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही कार्यालयांना एक वैद्यकीय रुग्णालयाची निर्मिती होणेस विनंती आहे.<br>**कार्यासन क्रमांक- २८- अे** | | नस्ती कार्यासन क्र. २८-अ यांचेकडून ई-ऑफीस नस्ती क्र.३१०७३५ दि.२१/०४/२०२६ रोजी या कार्यासनास प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने या कार्यालयाचे क्र.पोमसं/२६-ब/पोलीस प्राथमिक आरोग्य केंद्र/५२/२०२६, दि.०४/०५/२०२६ च्या पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य, पुणे यांचे आस्थापनेवर पोलीस रुग्णालय स्थापन करणेसाठी आवश्यक असलेली वैद्यकिय अधिकारी, परिचारिका, मिश्रक, कक्षसेवक, रुग्णासेवक तसेच आवश्यकतेनुसार इतर पदे मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव कारणमिमांसेसह व आवर्ती / अनावर्ती खर्चासह पाठविण्याबाबत अपर पोलीस महासंचालक व संचालक. पोलीस इळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य, पुणे यांना कळविण्यात आले असून सदरचा प्रस्ताव अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. | |
| ३. | श्री. अतुल अ. सबनिश, पोलीस उपअधीक्षक (गह), पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा. | पोलीस गृहनिर्माण संस्था यांचेकडून नवीन पोलीस वसाहती निर्माण करण्यात येत असून, सदर निवासस्थानातील मोठ्या प्रमाणातील देखभाल व दुरुस्तीची कामे हे ०५ वर्षांपर्यत संबंधित विकासदारांकडून करण्यात येत आहेत. परंतु किरकोळ | **अपर पोलीस महासंचालक (नि.व सं.) यांनी सदर प्रकरणाबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्यादित यांच्याकडे पत्रव्यवहार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **कार्यासन क्रमांक -२७**<br>सदर बाबत दि.०८/०५/२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे:-<br>**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई यांचे अभिप्रायः-**<br>१) प्रकल्पामधील सांडपण्याचा निचरामधील दुरुस्तीची कामे कंत्राटदारामार्फत दोष निवारण कालावधी ५ (पाच) वर्षापर्यंत साहित्याची अपूर्ण जोडणी (imperfect fixing of material), ओलसरपणा (Dampness), जल प्रतिबंध काम (Water Proofing Work), खंडित | मुद्दा निकाली निघाला आहे. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | देखभाल म्हणजेच सांडपाण्याचा निचरामधील दुरुस्तीची कामे व दररोजची साफसफाई इत्यादी कामांकरीता लागणारे अंदाजित प्रतिमहा रु.१००० हे पोलीस कर्मचारी यांना द्यावे लागतात. त्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडुन उपाययोजना करावी.<br>**कार्यासन क्रमांक – २७** | | वीजपुरवठा (Interrupted Electrical Supply), गटर तुंबणे (Chock up of Drainage), वाळवी प्रतिबंध काम (Anti Termieted Treatment) इत्यादी कामे करण्यात येतात.<br>२) इमारतीमधील दररोजची साफसफाई कामे कंत्राटदाराच्या दोष निवारण कालावधीमध्ये येत नसून, दररोजची साफसफाईची कामे ही वापरकर्ता यांचेकडून देखभाल (Maintenance) मधून करण्यात यावी.<br>**पोलीस अधीक्षक, सातारा यांचे अभिप्राय:-**<br>पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या अधिपत्याखालील पोलीस अधिकारी / अंमलदार यांना निवासस्थान हस्तांतरीत केल्यानंतर निवासस्थानाची साफसफाई करणेसाठी, सुरक्षा यंत्रणा, उद्यान देखभाल दुरुस्ती, निवासस्थानातील दैनंदिन घनकचरा (ओला व सुका) त्याची विल्हेवाट करणेसाठी व निवासस्थानासाठी पाणी पुरवठा करणे अशा कामांसाठी कोणतीही शासकीय तरतूद नसल्याने व सदरची कामे करणे अत्यावाश्यक असल्याने समितीमार्फत निर्णय घेऊन बी.व्ही.जी. इंडीया लि. हिजवंडी, पुणे यांची<br>उपरोक्त नमूद कामांकरीता नेमणूक करण्यात आली आहे. पोलीस अधिकारी / अंमलदार यांचेकडून दरमहा त्यांच्या वेतनातून खालील प्रमाणे कपात करण्याबाबत मान्यता घेण्यात आली आहे.<br>**अ.क्र. \| पदनाम \| मासिक वेतनातून करावयाची** | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>सभासद व घटक कार्यालयाचे नाव</th><th>उपस्थित केलेला मुद्दा</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश</th><th>कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td><table><tr><th></th><th></th><th>रक्कम</th></tr><tr><td>१.</td><td>पोलीस उपअधीक्षक</td><td>रू.२०००/-</td></tr><tr><td>२.</td><td>पोलीस उप नि. ते पो. नि.</td><td>रू.१५००/-</td></tr><tr><td>३.</td><td>पोलीस अंमलदार</td><td>रू.१०००/-</td></tr><tr><td>४.</td><td>मंत्रालयीन कर्मचारी व वर्ग ४ कर्मचारी</td><td>रू.८००/-</td></tr></table><br>पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अभिप्राय:-<br>खाजगी इमारत मधील राहणाऱ्या निवासी यांना निवासस्थानाची साफसफाई करणेसाठी, सुरक्षा यंत्रणा, उद्यान देखभाल दुरुस्ती, निवासस्थानातील दैनंदिन घनकचरा (ओला व सुका) त्याची विल्हेवाट करणेसाठी व निवासस्थानासाठी पाणी पुरवठा करणे इत्यादी कामांकरीता दरमहा मेंटन्स भरणा करावा लागतो. त्याचप्रमाणे देखील शासकीय इमारतमधील निवसी यांना उपरोक्त कामांकरीता देखभाल खर्च (Maintance) मधून दरमहा भरणा गरजेचे आहे.<br>सदरचा निर्णय हा घटक कार्यालयाच्या स्तरावर घेण्यात आलेला आहे. तसेच अशी तरतुद इतर घटक कार्यालयांमध्ये देखील आहे.</td><td></td></tr>
<tr><td>४.</td><td>आर.आर. भागवत, पोलीस निरीक्षक, महाराष्ट्र पोलीस गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे</td><td>राज्य राखीव पोलीस बल यांच्या अधिपत्याखाली प्रत्येक गटात मोठ्या प्रमाणात रिकाम्या जागा असून, सदर जागेत वन विभाग, खाजगी सेवाभावी</td><td>अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य मुंबई याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.</td><td>अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य मुंबई-<br>रा.रा.पो.बलातील विविध घटकांमध्ये नियोजित बांधकाम जागा वगळुन मैदाने व रस्त्यांचे कडेला तसेच मोकळ्या जागेत सन २०२५ या कालावधीत खालीलप्रमाणे ६५७३२ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.</td><td>मुद्दा निकाली निघाला आहे.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>सभासद व घटक कार्यालयाचे नाव</th><th>उपस्थित केलेला मुद्दा</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश</th><th>कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश</th></tr>
<tr><td></td><td></td><td>संस्था तसेच तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली जैव विविधता जपण्यासाठी विविध प्रकारचे भारतीय वृक्ष तसेच पाण्याची सोय करुन सदर जागेचा योग्य पध्दतीने विकास करण्यात यावा.</td><td></td><td>गट ३ जालना, गट ९ अमरावती, गट १२ हिंगोली, गट १४ छ.संभाजीनगर येथे झाडांना ठिबक सिंचनाव्दारे व टँकरव्दारे पाण्याची व्यवस्था करण्यात येते. गट ४, गट १३ गडचिरोली, गट १५ गोंदिया, गट १८ काटोल येथे झाडांना टँकरव्दारे पाण्याची व्यवस्था करण्यात येते. गट ६ धुळे येथे झाडांना वॉटर हार्वेस्टर, व टँकर व्दारे पाण्याची व्यवथा करण्यात येते
<table>
<tr><th></th><th>गट कार्यालयाचे नाव</th><th>सन २०२५ मध्ये कलेले वृक्षारोपण</th></tr>
<tr><td>१</td><td>विपामनि, रारापोबल, नागपूर</td><td>६५०</td></tr>
<tr><td>२</td><td>गट ३ जालना</td><td>११,१००</td></tr>
<tr><td>३</td><td>गट ४ नागपूर</td><td>५०६९</td></tr>
<tr><td>४</td><td>गट ६ धुळे</td><td>३८८०</td></tr>
<tr><td>५</td><td>गट ९ अमरावती</td><td>९५००</td></tr>
<tr><td>६</td><td>गट १२ हिंगोली</td><td>५०६२</td></tr>
<tr><td>७</td><td>गट १३ वडसा</td><td>९०००</td></tr>
<tr><td>८</td><td>गट १४ छ.संभाजीनगर</td><td>१००००</td></tr>
<tr><td>९</td><td>गट १५ गोंदिया</td><td>५३६१</td></tr>
<tr><td>१०</td><td>गट १७ चंद्रपूर</td><td>००<br>नवीन गट असुन सदर गटाकरीता जागा उपलब्ध</td></tr>
</table></td><td></td></tr>
</table>

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | नाही.<br>११ गट १८ काटोल ५६००<br>१२ राआप्रद, नागपूर २१०<br>१३ राआप्रद, धुळे ३००<br>**एकूण** ६५,७३२ | |
| ५. | आर.आर. भागवत, पोलीस निरीक्षक, महाराष्ट्र पोलीस गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | राज्य राखीव पोलीस बल, यांच्या आवारात राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शाळेत ने-आण करण्यासाठी बसचा वापर हा स्कुल बस म्हणून करण्यात येतो. परंतु बंदोबस्ताच्या वेळी सदर बस ही बंदोबस्तासाठी वापरण्यात येत असल्यामुळे, पाल्यांना शाळेत ने-आण करण्याकरीता बस उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून पाल्यांना शाळेत ने-आण करण्यासाठी स्वतंत्र बसची व्यवस्था करण्यात यावी. | **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म.राज्य, मुंबई यांनी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म.राज्य, मुंबई-** या परिक्षेत्रांतर्गत गट ३ जालना, गट -४ नागपूर, गट ६ धुळे, गट ९ अमरावती, गट १२ हिंगोली, गट १४ छ. संभाजीनगर व गट १५ गोंदिया कार्यालयात पोलीस पाल्यांना शाळेत नेआण करण्याकरीता स्वतंत्र बस असल्याने बंदोबस्ताच्या वेळी सदर बस बंदोबस्तासाठी वापरण्यात येत नाही. तसेच गट १३ गडचिरोली, येथे स्कुल बस कायदा व सुव्यस्था इतर बंदोबस्ताकरीता पुरविण्यातय येते. त्याबाबत पर्यायी व्यवस्था करण्याबाबत पालकांना सुचित करण्यात येते. व गट १७ चंद्रपूर व गट १८ काटोल हे नविन गट असल्याने यांचेकडे स्कुल बस वापरण्यात येत नाही. पोलीस पाल्यांना अडचण येणार नाही. याकरीता सदर घटकांनी पोलीस कल्याण निधीमधून बस खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा. पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांना सादर करणे अपेक्षीत आहे. | मुद्दा निकाली निघाला. |
| ६. | आर.आर. भागवत, पोलीस निरीक्षक, महाराष्ट्र पोलीस गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | DSB Manual, Jail Manual and SID Manual- ही महत्वाची पुस्तके सध्याच्या परिस्थितीच्या अनुरुप अशा | **आयुक्त, गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई यांनी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई-**<br>सदर मुद्द्याच्या अनुषंगाने SID मॅन्युअल अद्ययावत करण्याबाबतची कार्यवाही सुरू असून, सदर कार्यवाही पुढील ०४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. | मुद्दा निकाली निघाला. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | रीतीने अद्ययावत करणे आवश्यक आहे. | | | |
| ७. | सचिन पोवार, ११६६/ सहायक पोलीस उप निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०२ | राज्य राखील पोलीस बल मध्ये सध्या कंत्राटी पध्दतीने भोजन सेवक (गट -४) हे पद भरण्यात येत असून, सदर कंत्राटी भोजन सेवक यांना बंदोबस्तास नेमणुकीस असलेल्या कंपनी सोबत पाठविण्याकरिता अडचण निर्माण होते. यामुळे कायमस्वरुपी भोजन सेवक असलेल्या कर्मचाऱ्यांवर ताण पडतो. त्यामुळे भोजन सेवक (गट -४) हे पद कायमस्वरुपी मार्फतीनेच भरण्यात यावे.<br><br>**कार्यासन क्रमांक- ८ अ** | **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, / प्रशासन, म. राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **कार्यासन क्रमांक – ८ अ**<br>शासन निर्णय, गृह विभाग क्र.एपी- ११२२/ प्र.क्र.११५/पोल-३, दि.२८/११/२०२३ अन्वये, अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य, मुंबई व त्यांचे अधिनस्त घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली असून भोजनसेवक हे पद नियमित(कायमस्वरुपी) करण्यात आलेली आहेत.<br>महाराष्ट्र शासनाने दि.२७/०५/२०२४ च्या पत्रान्वये, राज्य राखीव पोलीस बलाच्या नियमित(कायमस्वरुपी) भोजनसेवक, सफाईगार, धोबी व न्हावी या संवर्गाच्या रिक्त असलेल्या पदांपैकी ५०% पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे.<br>त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या दि.१३/०६/२०२५ च्या पत्रान्वये, वर्ग -४ भरती प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने न घेता व्यावसायिक चाचणी नुसार घेणेबाबत शासन आदेश होणेस पुन्हा विनंती करण्यात आले आहे. सदर प्रस्ताव पोल-५ कडे प्रलंबित आहे. | **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, / प्रशासन, म. राज्य, मुंबई :-**<br>शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. |
| ८. | सचिन पोवार, ११६६/ सहायक पोलीस उप निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०२ | राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस उप निरीक्षक पदाच्या परिक्षाकरीता पोलीस हवालदार / सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदाची | **अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य मुंबई याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई :-**<br>प्रस्तुत मुद्याच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. | **अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई :-**<br>अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म. राज्य, मुंबई यांचे अभिप्राय घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | पात्रता रद्द करुन सरसकट १० किंवा १५ वर्ष ही एकच अट ठेवावी जेणेकरुन सर्वच गटातील कर्मचाऱ्यांना याचा फायदा होईल. | | | |
| ९. | सचिन पोवार, पोहवा/२०५९, पुणे ग्रामीण. | भारतीय सैन्य दलामध्ये युध्द कालावधीमध्ये कर्तव्य बजावत असतांना वीरगती प्राप्त झालेनंतर जवानांच्या कुटूंबियांना त्यांच्या मरणोत्तर परमवीर चक्र, महावीर चक्र, वीर चक्र तसेच दहशतवाद / नक्षलवाद व इतर आणीबाणीच्या ठिकाणी कर्तव्य करीत असताना वीरगती प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या कुटूंबियांना अशोक चक्र, किती चक्र आणि शौर्य चक्र पुरस्कार देण्यात येतो. त्याप्रमाणे पोलीस दलामध्ये पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार कर्तव्य बजावत असतांना वीर मरण आल्यास त्यांच्या कुटूंबियांना सुध्दा भारतीय सैन्य दलाप्रमाणे पुरस्कार देऊन सन्मानित | **विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना, म. राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.** | **कार्यासन क्रमांक- ९**<br>सदर मुद्दयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी कर्तव्यावर असतांना केलेल्या शौर्यपूर्ण कामगिरीच्या अनुषंगाने त्यांना अशोक चक्र, किर्ती चक्र, शौर्य चक्र, शौर्य पदक, राष्ट्रपतींचे शौर्य पदक व जीवन रक्षा पदक पुरस्कार देण्यात येत असतो. सन २०२५ मध्ये एकूण ०७ पोलीस अधिकारी / अंमलदार यांना शौर्य पदक देण्यात आले आहे.<br>तथापि, पोलीस अधिकारी / अंमलदार फक्त कर्तव्य बजावत असतांना त्यांना वीर मरण आल्यास त्यांच्या कुटूंबियांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याबाबत उपलब्ध नियमामध्ये कोणतीही तरतूद नाही. | **विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म. राज्य, मुंबई:-**<br>पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्याकडून माहिती मागविण्यात यावी व आवश्यक ती कार्यवाही करावी. |

| अ. क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | कार्यासन/ घटक कार्यालयाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | करण्यात यावे.<br>**कार्यासन क्रमांक-९** | | | |
| १०. | सचिन पोवार, ११६६/ सहायक पोलीस उप निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०२ | पोलीस कल्याण निधी नियमावली दि.२४/०२/२०२५ मधील नियम ९ (१)(ब)(२) उच्च शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती अनुदान पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट- ड यांना भारतीय अभियांत्रिकी संस्था, भारतातील कोणतेही वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास पोलीस कल्याण निधीमधून शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याचप्रमाणे सदरची शिष्यवृत्ती राष्ट्रीय फॅशन प्रोद्योगिक संस्था (NIFT) यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनादेखील मंजूर करावी. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल असे आश्वासीत केले आहे. तरी आवश्यक ती कार्यवाही करावी.** | सदरच्या मुद्द्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय फॅशन प्रोद्योगिक संस्थेमध्ये शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती मिळण्याबाबत अर्ज प्राप्त झाल्यास, त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई:-**<br>सदर मुद्द्याबाबत मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करून, निर्णय घेण्यात यावा. |

*****

## ५८ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा ( नवीन मुद्दे )

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| १ | पोहवा/९५५, श्री. पंकज पांडे, नेम. पोलीस मुख्यालय गोंदिया (सभासद) | पोलीस पाल्य यांना सेवानिवृत्तनंतर पोलीस पाल्य म्हणून गणण्यात येत असतांना त्यांची वय वाढून निघून जाते, ह्यामुळे पोलीस पाल्य म्हणून सेवानिवृत्त पुर्वी पोलीस पाल्याचा दर्जा देण्याची वि नंतीबाबत. | **पोलीस अधीक्षक, गोंदिया-**<br>पोलीस कुटुंब म्हणजे सेवा, त्याग शिस्तीचे मुर्तीमंत उदाहरण होय, स्वत:च्या कुटुंबापेक्षा पोलीस अहोरात्र मेहनत करुन अहोरात्र मेहनत करुन अपार कष्ट व नि:सवार्थ सेवेमुळे समाजात शांती आणि सुरक्षितता राहते. पोलीस हे आपले कुटुंबासह समाजसेवेचे व्रत घेतलेला एक सैनिक असतो.<br>त्याअनुषंगाने पोलीस पाल्य हे लहानपणापासून शिस्त, धाडस आणि जबाबदारीची जाणीव रुजलेली असते, त्यांच्या जास्त काळ हे पोलीस लाईन मध्ये राहत असल्याने सर्व जाती धर्माच्या लोकांच्या सोबत मिळून मिसळून राहण्याची सवय म्हणून त्यांच्यात समाजाविषयी स्वालंबन बनुन येते.<br>शासन निर्णयान्वये पोलीस भरतीत सेवानिवृत्ती नंतर पोलीस पाल्य म्हणून त्यांची गणना करण्यात येत असुन त्यांच्यासाठी ३ टक्के आरक्षण राखीव ठेवण्यात येत असते, परंतु त्यात त्यांचा लाभ घेता घेता अशावेळेस पोलीस पाल्यांची वय निघुन जाते. पोलीसांचे काम जास्त प्रमाणात जोखमीचे असल्याने त्यांच्या कुटुंबियांकडे लक्ष ही द्यायला वेळ मिळत नाही. अशावेळेस कदर करुन/सहानभुतीपुर्वक विचार करुन सेवानिवृत्ती होण्यापुर्वी ३ टक्के आरक्षण राखीव पोलीस भरतीत पोलीस पाल्यांना उपलब्ध झाल्यास त्याचा लाभ महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस पाल्यांना मोठया प्रमाणत होईल. | **अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई:-**<br>सद्य:स्थितीत पोलीस कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर पोलीस पाल्यांना ३ टक्के आरक्षण आहे. पोलीस कर्मचारी सेवेत असतानासुध्दा पोलीस पाल्यांना ३ टक्के आरक्षण द्यावे का ? याबाबत सर्व घटक प्रमुखांकडून त्यांचे अभिप्राय मागविण्यात यावेत. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | | तरी, सेवानिवृत्ती पुर्वी आरक्षण राखीव पोलीस भरतीत पोलीस पाल्यांना दर्जा देण्याबाबत शासन प्रस्तावित करण्याबाबत शिफारस आहे.<br>**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई:-**<br>महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पोलीस १८१५ / प्र.क्र. ३०६ / पोल-५ अ, दि.१६.०२.२०१६ नुसार पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-यांच्या पाल्यांसाठी ३ टक्के आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे. सदर आरक्षणाव्यतिरिक्त सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-यांच्या पाल्यांकरीता पोलीस भरतीमध्ये वयोमर्यादेत वाढ करणेबाबत प्रशासकीय दृष्टीकोनातून योग्य होणार नाही. | |
| २ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी स्वतंत्र नार्कोटिक्स कंट्रोल सेल निर्मितीकरणेबाबत-**<br>अंमली पदार्थांचा प्रश्न हा जागतिक स्तरावर गंभीर असून त्याचे दहशतवाद, संघटित गुन्हेगारी अर्थव्यवस्थेशी प्रत्यक्षसंबंध आहेत. युवकांचे भवितव्य, सामाजिक स्वास्थ्य व राष्ट्रीय सुरक्षा यावर त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत. म्हणून प्रत्येक जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात तसेच आयुक्तालयातील पोलीस | **विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ् विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, मुंबई-**<br>शासनाने अवैध अंमली पदार्थ यांची विक्री, पुरवठा आणि वितरण यामध्ये गुंतलेल्या सर्वांवर प्रभावी फौजदारी कारवाई करणेकरीता तसेच अंमली पदार्थ तस्करी आणि संबधित गुन्हयांविरुध्द समन्वित व कठोर कारवाई करण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची स्थापना महाराष्ट्र शासनाने केलेली आहे. महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण - १०२२/प्र.क्र १५३/वि.शा-३(अ) दिनांक ३१/०८/२०२३ अन्वये १५ मे २०२५ पासून कार्यरत अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने महाराष्ट्रात ०७ कार्यरत युनिटस व ३ प्रमुख कार्यालये स्थापन केली असून एकूण २२.३ मनुष्यबळ तैनात आहे, तसेच सर्व पोलीस आयुक्तालय व पोलीस अधीक्षक स्तरावर स्वतंत्र सेल कार्यरत आहेत. या करीता प्रशिक्षीत मनूष्यबळ, तांत्रिक | **विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, मुंबई:-**<br>ज्या पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी आहेत त्याठिकाणी ANTF सेलची स्थापना करण्यात यावी. तेथील पोलीस अधिकारी यांना प्रशिक्षण दयावे, आवश्यक साधणे पुरवावीत तसेच फॉरेन्सीक कीट व फॉरेन्सीक व्हॅन देखील ठेवण्यात यावे. तसेच सहायक पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी पण Raid करू शकतो. प्रशिक्षण दिलेला ०१ पोलीस अधिकारी Raid करू शकेल असे निर्देश दयावेत. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** |
|---|---|---|---|---|
| | | उपायुक्त कार्यालयात स्वतंत्र नार्कोटिक्स कंट्रोल सेल स्थापन करण्यात यावा. याकरिता प्रशिक्षित मनुष्यबळ तांत्रिक साधने, स्वतंत्र निधी, वाहन व्यवस्था व एनडीपीएस तपासणी किट उपलब्ध करण्यात यावा. याकरिता प्रशिक्षित मनुष्यबळ, तांत्रिक साधने, स्वातंत्र निधी, वाहन व्यवस्था व एनडीपीएस तपासणी किट उपलब्ध करुन देण्यात यावीत. आंतरजिल्हा/आंतरराज्य समन्वय प्रणाली अधिक बळकट करण्यात यावी. | साधने, वाहने संवधीत घटक प्रमुखाकडून पुरविलेली आहेत. संबधीत पोलीस अधिकारी/अंमलदारांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु आहे. ६ प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे ७३७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ANTT साठी संवधीत अधिकारी अंमलदार प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कडून आत्तापर्यंत ५२ ड्रग डिटेक्शन किट व १२ प्रिकर्सर केमिकल किट मागणीनुसार पुरविण्यात आले. तसेच संबधीत घटकांना मागणीनुसार ड्रग डिटेक्शन किट पुरविण्यात येतात.<br>सर्व जिल्हे व इतर राज्यातील ANTF सोबत ANTF महाराष्ट्र समन्वयाने कामकाज करीत आहे. | |
| ३ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **पोलीस ठाणे व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे कार्यालयांमधील चित्रीकरणाबाबत मानक कार्यपध्दती** (SOP)–<br>पारदर्शकतेचे तत्व अत्यंत महत्वाचे आहे, मात्र पारदर्शकतेच्या नावाखाली पोलीस ठाण्यातील किंवा वरिष्ठ पोलीस कार्यालयातील विनापरवानगी चित्रीकरणामुळे पोलीस कार्यात अडथळा निर्माण होतो. व्यक्ती स्वातंत्र्याचा आधार जरी घेतला तरी काही मुलभूत कर्तव्य पण नागरीकांनी विचारात घेतली पाहीजे. पोलीस ठाण्यात किंवा पोलीस कार्यालयात | **कार्यासन क्रमांक-२२**<br>पोलीस ठाणे व पोलीस कार्यालयातील छायाचित्रण / व्हिडीओ चित्रीकरणाबाबत पारदर्शकता व गोपनीयता या संदर्भातील मुद्दा हा प्रस्तुत कार्यासनाच्या विषयक्षेत्राशी संबंधित नसून, सदर विषयाबाबत प्रशासकीय व धोरणात्मक स्तरावर आवश्यक निर्णय घेणे तसेच आवश्यकतेनुसार विधी अभिप्राय घेणे अपेक्षित आहे. | **अपर पोलीस महासंचालक (का. व सु.), म. राज्य, मुंबई:-**<br>कायदेशीर बाबी तपासून अभिप्राय दयावेत. पोलीस स्टेशनमध्ये खाजगी व्यक्तीच्या चित्रिकरणामुळे सरकारी कामात अडथळा निर्माण होऊ शकतो. पोलीस स्टेशनमध्ये CCTV असतात. कोणाला CCTV Footage हवे असतील तर एक Process निश्चित करावी. त्या प्रोसेस नुसार ते उपलब्ध करुन देता येईल. लोकांची Privacy आणि कामाची Dignity याचे संतुलन करता येईल. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** |
|---|---|---|---|---|
| | | येणारी व्यक्ती ही विवंचनाग्रस्त, न्यायपेक्षित, पिडित किंवा मदतीकरिता आलेली असते. पोलीस ठाणे व कार्यालयातील महत्वाची बाब म्हणजे तपास, चित्रिकरणांमुळे तपासातील संवेदशील बाबी उघड होण्याचा धोका संभावतो, महिला पोलीस अधिकारी, अंमलदार यांचेसाठी तसेच तक्रारीसाठी किंवा अन्य कार्यासाठी उपस्थित महिला/बालके यांच्या गोपनियतेचा व खाजगी आयुष्याचा संविधानिक अधिकार बाधित होऊ शकतो. त्यामुळे कोणतेही चित्रीकरण करण्यापूर्वी संबंधित अधिका-याची पूर्व परवानगी बंधणकारक करण्यात यावी. चित्रीकरणाचा उद्देश व स्वत: ओळख स्पष्ट करणे, चित्रीकरणाचा विनियोग काय करणार या बाबी अनिवार्य असाव्यात. महिला उपस्थित असलेल्या भागात विशेष संरक्षणात्मक नियम लागू करावेत. उल्लंघन झाल्यास स्पष्ट कार्यवाईबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात यावेत. | | |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **तपास यंत्रणा व कायदा सुव्यस्था व अन्य महत्वाचे कार्यांचे संरचनात्मक विभाजन व दोषसिध्दी वृध्दी-**<br>पोलीस हवालदारावर पुढील व्यापक जबाबदा-या येतात. त्यामध्ये प्रामुख्याने गुन्हे अन्वेषण, गुन्हे प्रतिबंध, कायदा व सुव्यवस्था राखणे, वाहतुक नियंत्रण व नियमन, विविध विशेष कायदांच्या अंमलबजावणी, सन उत्सव व विशेष जबाबदारी, व्हीआयपी/व्हीव्हीआयपी सुरक्षा, सामाजिक व धार्मिक तणाव हाताळणे, मानवी जिवित, मालमत्ता व अन्य प्राणीजिवांचे संरक्षण, ज्येष्ठ नागरिक, महिला व बालकांचे विशेष संरक्षण, सायबर गुन्हेगारी प्रतिबंध, आपत्कालीन परिस्थीती, नैसर्गिक संकटे, विविध न्यायालयीन कामकाज, पोलीस ठाणे व कार्यालयातील दिवस रात्रचे दैनंदिन कर्तव्य इ. सर्व प्रकारच्या कामकाजाचा विचार होणे अपेक्षित आहे. तपास यंत्रणेच्या बाबतीत गुन्हयाची व्यापकता, संवेदनशीलता व गांभीर्य पूर्वनिश्चित सांगता येत नाही. आरोपी कोणत्या दिशेने पलायन करेल, पुरावे नष्ठ करण्यासाठी कोणते उपाय करेल, आरोपी किती असतील, घडलेल्या घटनेनंतर सामाजिक, शासन पातळीवर कसे पडसाद | **कार्यासन क्रमांक-२६ ब :-**<br>कार्यासन क्रमांक २६-ब मधून राज्यातील पोलीस घटकांसाठी नवीन पदे निर्माण करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतात.<br>तथापि, राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद सभेवरील सभासद यांनी उपस्थित केलेला मुद्दा पोलीसांवरील जबाबदा-या, विविध प्रकारचे गुन्हे विषयक कार्यवाही, सुरक्षा विषयक, तपासाच्या दृष्टीने मदत, प्रशिक्षीत व अनुभवी मनुष्यबळ, वाहने, संसाधने नीधी या बाबत असून सदरचा मुद्दा या कार्यासनाशी संबंधित नाही. | **अपर पोलीस महासंचालक (का. व सु.), म. राज्य, मुंबई:-**<br>यापूर्वीच कार्यालयीन आदेश निर्गमित केले आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनला ६ विषय दिले आहेत. ही प्रक्रिया Under Process आहे. त्यातून चांगले IO तयार होतील. त्यांचे प्रशिक्षणानंतर त्यांना नवीन काही करण्याची आवश्यकता वाटत नाही. तरी यासंदर्भात एक VC आयोजित करावी. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | उमटतील यांचा अंदाज घेणे बांधणे कठीण असते. तपासाठी सातत्यपूर्ण एकाग्रता व तांत्रिक कौशल्य आवश्यक असते. व तपास हा व्यावसायिक आणि जलदगतीने सबळ पुराव्यानिशी पारदर्शक, गोपनिय पध्दतीने करणे अत्यावश्यक असते. त्या तपासावर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे पर्यवेक्षण असते. विहित मुतदतीत तपास करुन दोषारोप दाखल करणे हे महत्वाचे कर्तव्य आहे. सध्या परिस्थितीत एका तपास अधिकार-याकडे एकाच वेळी विविध प्रकारचे गुन्हे, आकस्मिक मृत्यु, अपघातसंबंधातील प्रकरणे असतात अशावेळी वरीलप्रमाणे व्यापक कार्य करुन गुन्हाची योग्य प्रकारे न्यायिक, गतिमान, सबळ पुरव्यानिशी तपास होईल असे वाटत नाही. म्हणून तपास यंत्रणा सक्षम करणे जरुरीचे दिसत आहे. त्यांना आवश्यक तांत्रिक तपासाच्या दृष्टीने मदत, प्रशिक्षीत व अनुभवी मनुष्यबळ, वाहने, संसाधने निधी उपलब्ध असावेत. | | |
| ५ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **अल्प मनुष्यबळ, बदलते गुन्हेगारी स्वरुप, वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण, सागरी सुरक्षा व अन्य प्रकारच्या सर्व सुरक्षा विचारात घेवून वाढत्या पायाभूत सुविधांच्या संरक्षणासाठी** | **कार्यासन क्रमांक-२६ ब:-**<br>शासनाकडून सन २०२३ ते सन २०२६ पर्यंत राज्यातील विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस अधिकारी/ अंमलदार यांची एकूण ५४१९ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. तसेच राज्यातील विविध घटकांच्या | **अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), म. राज्य, मुंबई :-**<br>आवश्यक ती कार्यवाही करावी. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** |
|---|---|---|---|---|
| | | व्यापक फेररचना-<br>जिल्हा व आयुक्तालय स्थापन करतांना निश्चित केलेले पोलीस मनुष्यबळ त्या काळातील परिस्थीतीनुसार होते. आज औद्योगिकीकरण, शहरीकरण, लोकसंख्या वाढ, सोशल मिडीया प्रभाव, सायबर गुन्हे, महिला-बालकांवरील गुन्हांची वाढ, सामाजिक धार्मीक तणाव, व्हीआयपी/व्हीव्हीआयपी सुरक्षा, वाहतुक नियंत्रण, दहशतवाद, गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण यामुळे सर्वंकक्ष ताण व अनेकपटींनी वाढवून पोलीसांची मानसिक स्थितीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामध्ये सागरी सुरक्षा, सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ मुक्ती ही देशासमोरील मोठी आव्हाने आहेत. वाढलेली बंदरे, व्यापारमार्ग, औद्योगिक प्रकल्प, विमानतळ, रेल्वे जाळे, महामार्ग व कारखाने, उद्योगधंदे, इतर पयाभूत सुविधा व राज्याची व देशाची सुरक्षा अंतर्गत बळकट करण्याच्या अनुषंगाने सध्याचे पोलीस मनुष्यबळ अत्यल्प आहे. **याकरिता भविष्योन्मुख, शाश्वत व दीर्घकालीन पोलीस मनुष्यबळ** | आस्थापनेवर पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे मनुष्यबळ मंजूर होण्याबाबतचे एकूण ५८ प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत.<br><br>**कार्यासन अधिकारी, का. क्र. ४४:-**<br>सध्या अस्तित्त्वात असलेल्या पोलीस ठाण्यांमध्ये सन १९६० च्या शासन निर्णय Government of Bombay, Home Department Resolation No. PRS-५३५९/५७-V Sachivalay, Bombay-३२ Dated २३rd January, १९६० अन्वये ठरवून दिलेल्या निकषांच्या आधारे मनुष्यबळ कार्यरत आहे. सदरचे निकष ठरवून जवळ-जवळ ६४ वर्षाचा कालावधी उलटलेला आहे. जीवनमान पध्दत, गुन्ह्यांचे बदलेले स्वरुप, सोशल मिडीयाच्या माध्यमातुन होणारे धार्मिक / राजकीय गुन्हे त्यांचे उमटणारे पडसाद, इंटरनेटच्या माध्यमातुन होणारे आर्थिक फसवणुकीचे गुन्हे यामध्ये आमुलाग्र असा बदल झालेला आहे. त्याच्या तुलनेत सध्याचे पोलीस मनुष्यबळ निश्चितच अपुरे आहे. याकरीता सद्यस्थितीत नवीन तंत्रज्ञान तसेच गुन्ह्यांची संख्या विचारात घेवून १९६० मध्ये तयार करण्यात आलेले पोलीस स्टेशन निर्मितीचे प्रमाणक फेर तपासण्यात येवून नवीन पोलीस स्टेशन निर्मिती करताना त्यासाठी आवश्यक मनुष्यबळाचे नव्याने तयार करण्यात आलेल्या सुधारित प्रमाणक यांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.<br>त्यानुसार राज्यातील पोलीस आयुक्तालय आणि जिल्ह्यामधील पोलीस ठाण्यांच्या आवश्यकतेनुसार | |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** |
|---|---|---|---|---|
| | | **फेरसर्वेक्षण व नियोजन करुन निर्मित करावी.** | पोलीस ठाणेसाठी महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. ओपीओ-३६२२/ प्र.क्र.१०४(१)/पोल-३, दि.२५/०८/२०२३ आणि पोलीस आयुक्त, लोहमार्ग व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पोलीस ठाणेसाठी मनुष्यबळाचे प्रमाणक / निकष ठरविणेबाबत शासन गृह विभाग, क्र. ओपीओ-३६२२/प्र.क्र.१०५/पोल-३, दि.१६/१०/२०२३ अन्वये शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. सोबत शासन निर्णयांच्या प्रती जोडलेल्या आहेत.<br>त्याचप्रमाणे, शासन पत्र क्र. १७/०८/२०२१ अन्वये, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयान्वये, महाराष्ट्र पोलीस दलातील १७ विशेष पोलीस घटक, ११ आयुक्तालये, ८ परिक्षेत्र व ३४ जिल्हे अशा एकूण ७० घटकांच्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच प्रशासकीय अधिकारी व<br>कर्मचारी यांच्या दिनांक ३०.०९.२०२१ रोजीपर्यंतच्या मंजूर पदांचा आढावा घेवून सन २०२३ मध्ये उपरोक्त ६९ पोलीस घटकांचे आकृतीबंधाचे (मनुष्यबळाचे) एकूण २७ शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे.<br>सदर शासन निर्णय पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत. | |
| ६ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **पोलीस भरती प्रक्रीयेस विशेष कर्तव्य दर्जा व स्वतंत्र भत्ता देण्याबाबत-**<br>पोलीस भरती प्रक्रीया ही नियमित कायदा व सुरक्षा किंवा प्रशासकीय कामांपेक्षा भिन्न, अत्यंत संवेदनशील व जबाबदारीची विशेष कार्यवाही आहे. | **अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई.-**<br>राज्यातील विविध घटकांत पोलीस शिपाई संवर्गात रिक्त असलेली/होणारी पदे पोलीस शिपाई भरतीने भरण्यात येतात. पोलीस शिपाई भरतीचे कामकाज हाताळणा-या मंत्रालयीन अधिकारी व | **मुद्दा निकाली निघाला आहे.** |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | मोठया प्रमाणावर उमेदवार व्यवस्थापन, शारीरिक व लेखी चाचण्या, पारदर्शकता उपाययोजना व सुरक्षा नियोजन यामुळे पोलीस अधिकारी व अंमलदार व मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी हे त्यांचे दैनंदीन कर्तव्य संभाळून पोलीस भरती कर्तव्य बजावित असतांना त्यामुळे त्यांचेवर अतिरिक्त कामाचा ताण येतो. MPSC मार्फत आयोजित केल्या जाणा-या भरती प्रक्रियावेळी जसे मानधन/विशेष भत्ता दिला जातो, त्याच धर्तीवर पोलीस भरती प्रक्रीयेस "विशेष कर्तव्य घोषीत करुन भरती प्रक्रीयेस काम करणा-या संबंधित अधिकारी /अंमलदार/ मंत्रालयीन अधिकारी व कर्मचा-यांना स्वतंत्र मानधन/ भत्ता मंजूर करण्यात यावा. | कर्मचारी हे त्यांचे नियमीत कामकाज संभाळून पोलीस भरतीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडत असतात. सदर कामात त्यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबाबत त्यांना त्यानुसार प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येते. तसेच पोलीस शिपाई भरती प्रक्रीयेमधील शारीरिक चाचणी व लेखी परीक्षादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता भरतीचे कामकाज बंदोबस्तकामी नेमण्यात आलेल्या पोलीस भरतीचे कामकाज हाताळणा-या पोलीस अधिकारी/अंमलदार व मंत्रालयीन अधिकारी/कर्मचा-यांना मानधन देण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने त्यांना प्रोत्साहन भत्ता देता येत नाही. | |
| ७ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **प्रशासकीय कामासाठी जिल्हयाबाहेर जाणा-या वाहनांना इंधन पुरविणे-** शासकीय वाहने ही बंदोबस्त, गुन्हे तपास अथवा इतर प्रशासकीय कामानिमित्त जिल्हाबाहेर जातात अशावेळी इतर पोलीस मोटार परिवहन विभागामध्ये वाहनांसाठी आवश्यक असलेले इंधन मिळवणे | **कार्यासन क्रमांक-१९ अे** मुद्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, राज्यातील वेगवेगळया जिल्हयाच्या आस्थापनेवरील पोलीस दलाची वाहने शासकीय कामानिमीत्त त्यांच्या घटकातून इतर ठिकाणी जाण्याकरीता मार्गसत झाल्यानंतर इंधनाचा तुटवडा भासल्यास, सदर वाहनांना आवश्यक्तेप्रमाणे पुरेसा इंधनाचा पुरवठा करण्यात यावा. याबाबत या कार्यालयाचे पोमसं/१९/इंधन पुरवठा | **विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म. राज्य, पुणे :-** सदर मुद्द्याच्या अनुषंगाने पेट्रोल कार्ड जे डेबिट कार्ड सारखे वापरता येईल याबाबत अभ्यास करावा. आवश्यकता भासल्यास श्री. संतोष रस्तोगी यांच्याशी संपर्क साधावा व आवश्यक ती कार्यवाही करावी. पेट्रोल कार्डबाबत प्रयोग एका घटकामध्ये करून बघावा. पेट्रोल कार्ड फक्त जिल्हयाबाहेर जाणा-यांसाठी |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** |
|---|---|---|---|---|
| | | आवश्यक आहे. परंतु २० लिटर इंधन पुरवठा केले जाते. मोठया वाहनांच्या ॲव्हरेज प्रमाणात २० इंधन अपुरे पडते. काही ठिकाणी मोटार परिवहन विभाग ते मुख्य रस्ता हे अंतर २५ कि.मी. ते ३० कि.मी. असते, अशावेळी मिळणारे इंधन हे नमूद प्रवासातच खर्च होते. तर काही जिल्हयातील मोटार परिवहन विभागामध्ये इंधन पोलीस उपअधीक्षक यांचे आदेशाने दिले जाते. अशावेळी वाहनात आरोपी असतांना ५ ते ६ तास डिझेल मंजुरीकरता लागतात. त्याकरीता जिल्हयाबाहेर वाहन गेल्यास वाहनाकरीता इंधन फुल टँक भरुन मिळणे योग्य व सोईचे राहील. | गडचिरोली/२००/२०१७, दि.२३/१०/२०१७ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांना कळविण्यात आलेले आहे.<br>तरी, याबाबत **अपर पोलीस महासंचालक / संचालक दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन पुणे यांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.** | असावे. |
| ८ | श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदुर्ग जिल्हा (सभासद) | **वाहनांचे देखभाल व दुरुस्ती करणेसाठी वित्तीय मर्यादेत वाढ करणे-**<br>शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, दि.१७/०४/२०१५ अन्वये, पेट्रोलवर चालणा-या वाहनास दुरुस्ती व देखभालासाठी रु. ५०,०००/- व डिझेलवर चालणा-या वाहनास | कार्यासन क्रमांक-१९ अे<br>या मुद्यावावत कळविण्यात येते की, या कार्यालयाकडून अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळ व मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते. त्यानुषंगाने त्यांचे दि.०२/०७/२०२६ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती सादर केलेली आहे.<br>सर्व पोलीस आयुक्तालय आणि पोलीस अधीक्षक, गडचिरोली व पुणे ग्रामीण तसेच पोलीस उप अधीक्षक, पोलीस मध्यवर्ती मोटार कर्मशाळा, पुणे, नागपूर, परिवहन, | **विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म. राज्य, पुणे :-**<br>सद्य:स्थितीनुसार वित्तीय मर्यादेनुसार सुधारीत प्रस्ताव सादर करावा. नविन गाडयांवर जास्त खर्च यायला नको. गाडीच्या किंमतीपेक्षा अधिक दुरूस्ती खर्च नसावा. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | दुरुस्ती व देखभालासाठी रु. ६०,०००/- इतका खर्च करण्याचे अधिकार प्रदान आहेत.त्यामध्ये महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१५/प्र.क्र.२०/२०१५/विनिमय दि.१९/०१/२०१६ अन्वये, सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षापासून दरवर्षी ५% प्रमाणात वाढीची वित्तीय मर्यादा विहीत केलेली आहे. परंतु आस्थापनेवर प्राप्त होणारी नवीन वाहने अत्याधुनिक असल्याने त्यावरील सर्व्हीसिंग/दुरस्ती खर्च जास्त प्रमाणात असतो. त्याऐवजी पेट्रोल व डिझेल वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च हा वित्तीय वर्षाच्या मर्यादेपर्यंत न ठरविता प्रतिवर्षी वाहनांच्या पुस्तकी किंमतीच्या २५% पर्यंत वाढ करण्यात यावी. | छ.संभाजीनगर यांनी सादर केलेल्या अभिप्रायाशी ते सहमत असून बी.आर. कार व स्पेशल पर्पज व्हेईकलच्या संदर्भात देखभाल व दुरुस्ती खर्चाची विहीत वित्तीय मर्यादा प्रतिवर्ष प्रति वाहन रु.१०.०० लक्ष इतकी वाढ करणेवावत तसेच शासकीय वाहन (डिझेल व पेट्रोल) दुरुस्तीकरिता वार्षिक खर्चाची मर्यादेत १० टक्के वाढ करण्याबाबत विनंती केली आहे.<br>तरी, प्रस्तुत प्रकरणातील उपरोक्त घटकांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने लवकरात लवकर या कार्यालयाकडून वित्तीय मर्यादेत वाढ होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याची तजवीज ठेवली आहे. | |
| ९ | सपोशि/१०४७, गणेश गोविंद पाटील, समादेशक, रारापोबल, गट क्र.११,नवी मुंबई | राज्य राखीव पोलीस बलामध्ये कार्यरत असलेल्या वर्ग-४ महिला कर्मचा-यांसाठी सध्या स्वातंत्र बॅरेक व स्वच्छतागृह ची पुरेशी व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महिला कर्मचा-यांची सुरक्षितता , गोपनीयता व मुलभूत सुविधा लक्षात | **कार्यासन क्रमांक-२७**<br>सदर मुद्दयाच्या अनुषंगाने राज्य राखीव पोलीस बलामध्ये कार्यरत असलेल्या वर्ग ४ महिला कर्मचा-यांसाठी सध्या स्वतंत्र बॅरेक व स्वच्छतागृहाची पुरेशी व्यवस्था उपलब्ध करून दिली असून, त्यांचेकरिता ०१ स्वतंत्र स्वच्छतागृह राखीव ठेवण्यात आले असल्याचे समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ११ यांनी कळविले आहे. | **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई:-**<br>सदर मुद्दयाच्या अनुषंगाने स्वतंत्र बॅरेक व स्वच्छतागृहाची व्यवस्था उपलब्ध आहे का याबाबत सविस्तर माहिती घेवून, चार आठवडयात लेखी अहवाल सादर करावा. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | घेता त्यांच्यासाठी स्वतंत्र बॅरेक व स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी. | | |
| १० | सपोशि/१०४७, गणेश गोविंद पाटील, समादेशक, रारापोबल, गट क्र.११,नवी मुंबई | राज्य राखीव पोलीस बलातून आंतरजिल्हा बदलीसाठी जिल्हयातील रिक्त पदांच्या १०% अशी अट आहे. तसेच जिल्हा बदलीसाठी १७ ते १८ वर्षे प्रतिक्षा करावी लागते त्यामुळे अंमलदारांना न्याय मिळण्यासाठी आंतरजिल्हा बदलीसाठी असलेली १०% ची मर्यादा वाढवून किमान २०% करण्यात यावी. | कार्यासन क्रमांक- ६<br>अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई यांचे कडून अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार अपोमसं, रारापोबल, म. राज्य, मुंबई यांनी दि.२९/०४/२०२६ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत:-<br>शासन परिपत्रक दि.१२/०५/२०२१ व शुद्धीपत्रक दि.२९/११/२०२२ नुसार १२ वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या व जिल्हा बदलीस पात्रता अटीत बसत असलेले अंमलदार यांना बदलीसाठी १०% मर्यादा शासनाने निश्चित केलेली आहे. सदर मर्यादा वाढवल्यास गटातील रिक्त पदे वाढून बंदोबस्तासाठी मनुष्यबळावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच जो प्रशिक्षित व सेवाजेष्ठ अंमलदार वर्ग आहे तो बहूसंख्येने बदलून गेल्यास सेवेत नवीन नियुक्त झालेल्या अंमलदार यांचेवर योग्य नियंत्रक वर्ग यांचा तुटवडा होवून पदोन्नतीवर देखील त्याचा विपरीत परिणाम संभवतो. त्यामुळे जिल्हा बदलीची सध्याची १०% ही मर्यादा योग्य असून, त्यामध्ये बदल करण्यात येवू नये. | **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई:-**<br>पोलीस अंमलदार राज्य राखीव पोलीस बल घटकातून बाहेर गेल्यावर रा.रा.पो.बल येथील पदोन्नती लवकर होईल किंवा कसे याबाबत अभ्यास करावा. बदली करीता विनंती केल्यावर किती वर्षांनी बदली होते ते तपासावे. |
| ११. | सपोशि/१०४७, गणेश गोविंद पाटील, समादेशक, रारापोबल, गट क्र.११,नवी मुंबई | खाते अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक (DPSI) पदाची MPSC मार्फत घेण्यात आलेल्या २०२३ च्या परिक्षेत सुमारे २०१ उमेदवारांनी कॉपी केल्याचे समोर आले आहे. आपण शिस्तप्रिय खात्याचे अंमलदार असून सर्वांना | **कार्यासन क्रमांक- ५**<br>खाते अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक (DPSI) पदाची MPSC मार्फत घेण्यात आलेल्या- २०२३ च्या परीक्षेत उमेदवारांनी केलेल्या - कॉपीचा मुद्दा हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी संबंधित आहे. | **विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म. राज्य, मुंबई:-**<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) यांच्याकडून याबाबतची सविस्तर माहिती घ्यावी. जर यामध्ये तथ्य असेल तर आवश्यक ती कार्यवाही करावी. |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | घटक/कार्यासनाचे अभिप्राय | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** |
|---|---|---|---|---|
| | | कायद्याचे परिपूर्ण ज्ञान आहे. तरीसुध्दा असे गैरवर्तन करण्यात आल्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलिन झाली आहे. तथापी यामुळे प्रक्रिया जवळपास ३ वर्षे लांबली तरी मा. महोदयांनी संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात यावी, ही नम्र विनंती आहे. | तसेच खात्या अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक (DPSI) पदाची MPSC मार्फत घेण्यात आलेल्या २०२३ च्या परीक्षेचा अंतिम निकाल लागलेला असून शासनपत्र दि.१६/०६/२०२६ अन्वये पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२३ मधील ६०३ उमेदवारांची पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीसाठी या कार्यालयास शिफारस केली आहे. सदर उमेदवारांची आवेदनपत्रे व साक्षांकन नमुने या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. सदर प्रकरणी या कार्यालयाकडून दि.२५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांच्या कार्यालयास प्रशिक्षण दिनांक व सत्र क्रमांक या कार्यालयास कळविणेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांनी त्यांच्या दि.०३/०७/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रशिक्षण सत्र क्र. १२९ दि.०४/०८/२०२६ पासून सुरु करता येईल असे कळविले आहे. (प्रत संलग्न) तरी, दि.०४/०८/२०२६ पासून सुरु होणाऱ्या प्रशिक्षण सत्र क्र.१२९ च्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाच्या दि.०७/०७/२०२६ चे पत्रान्वये संबंधित घटकांना कळविण्यात आले आहे. | |

## ५८ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा (आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे )

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश | घटक/कार्यासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. नईम खान मैनोद्दीन खान, पोलीस उप निरीक्षक, नांदेड | लाचलुचपत प्रतिबंधक विभागात कार्यरत असलेले पोलीस अधिकारी वर्गाला ज्याप्रमाणे एक टप्पा पदोन्नतीवर नेमणूक असते, त्याच धर्तीवर पोलीस अंमलदार यांना सुध्दा एक टप्पा पदोन्नती किंवा एक आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करण्यात येवून, पोलीस अमंलदारांना पण समकक्ष न्याय दयावा. | **विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म. राज्य, मुंबई :-** महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई यांच्याशी पत्रव्यवहार करून, आवश्यक ती कार्यवाही करावी. | |
| २. | श्री. पंकज पवनलाल पांडे, सपोपनि/९५५, गोंदिया | पोलीस विभागातील पोलीस अंमलदार (शिपाई), एस-८, पोलीस हवालदार, एस-१२, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, एस-१४, पोलीस उपनिरीक्षक, एस-१६ याप्रमाणे दिनांक ०१/०१/२००६ पासून वेतन त्रुटी निवारण समिती स्थापन करून सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात यावी. | **विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म. राज्य, मुंबई :-** आवश्यक ती कार्यवाही करावी. | |
| ३. | श्री. पंकज पवनलाल पांडे, सपोपनि/९५५, गोंदिया | दि.०१ डिसेंबर, १९९० रोजी पासून ज्या अधिकारी /अंमलदार यांनी विशेष अभियान पथक /सी-६० पथकामध्ये कामगिरी केलेली आहे व दि.१७/०४/२०२६ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्ती मध्ये पात्र आहेत अशा (सीनीयर) अधिकारी व अंमलदार यांचे नावाची यादी या पुढे पाठविण्यात यावे ज्यामुळे पुढे नजीकचे काळात कुणीही सेवानिवृत्त होणारे अधिकारी / अंमलदार ज्यांनी अति कठेर परीश्रम करून नक्षलवादी यांचेवर आळा बसविण्यासाठी यशस्वीरित्या सामना करून कर्तव्य बजावलेले आहे अशा अधिकारी अंमलदार यांना प्रोत्साहीत करून त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी, त्यांच्या गुणवत्तापुर्ण सेवेची दखल होण्यास विनंती आहे. जेणेकरून यापुढे कुणावरही अन्याय होणार नाही व कुणीही पोलीस अधिकारी / अंमलदार सी-६० पदक पासुन वंचित राहणार नाही. | **विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), म. राज्य, मुंबई:-** आवश्यक ती कार्यवाही करावी. | |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** | घटक/कार्यासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ४. | श्री. दत्तात्रय चंद्रकांत पवार, पोलीस उप निरीक्षक मो.प., पोलीस चालक प्रशिक्षण शाळा, पुणे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभागामध्ये पोलीस निरीक्षक तांत्रिक मो.प.वि. यांची एकूण ७२ पदे मंजूर असून, ५० पदे हजर आहेत. व २२ पदे रिक्त असून, सदरची पदे भरल्यास मागील अधिका-यांना पदोन्नतीचा लाभ लवकर मिळेल तसेच इतर अधिका-यांवर येणारा कामाचा ताण कमी होईल. | **विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म. राज्य, पुणे:-**<br>जसे पात्र पोलीस अधिकारी उपलब्ध होतील तशी पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.<br><br>**मुद्दा निकाली निघाला.** | |
| ५. | श्री. विनोद गजानन भुरले,<br>पोलीस उपनिरीक्षक, चंद्रपूर | चंद्रपूर जिल्ह्यातील पोलीस अधिकारी/अंमलदारांना शासकीय कर्तव्यानिमित्त जिल्ह्याबाहेर जाताना प्रवास वारंट देण्यात येतात. मात्र सदर वारंट केवळ एस.टी.च्या जनरल बसमध्येच स्वीकारले जात असून शिवशाही, ई-बस, रातराणी व इतर बससेवांमध्ये स्वीकारले जात नाहीत. त्यामुळे विशेषतः परतीच्या प्रवासावेळी जनरल बस उपलब्ध नसल्यास अधिकारी/अंमलदारांना अनावश्यक मुक्काम करावा लागतो व शासकीय कामकाजात अडचणी निर्माण होतात.<br>तरी पोलीस प्रवास वारंट महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवांमध्ये स्वीकारण्याबाबत संबंधितांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत, ही नम्र विनंती. | **पोलीस अधीक्षक, चंद्रपूर:-**<br>ST Coupons / Warrant हे Investigation Fund मधून घेता येईल का ते तपासावे. | |
| ६. | श्री. विनोद गजानन भुरले,<br>पोलीस उपनिरीक्षक, चंद्रपूर | सेवानिवृत्तीनंतर MPKAY योजनेचा लाभ मिळण्याबाबत पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे सेवाकाळात MPKAY (महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना) अंतर्गत उपचार घेण्यास पात्र असतात. मात्र, सेवानिवृत्तीनंतर अधिकारी/अंमलदार तसेच त्यांच्या कुटुंबीयांना या योजनेचा लाभ मिळत नाही.<br>तरी, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांनाही MPKAY योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात यावा, अशी विनंती आहे. यामुळे सेवानिवृत्तीनंतरच्या आरोग्यविषयक खर्चाचा मोठा भार कमी होऊन त्यांना आवश्यक वैद्यकीय उपचार वेळेवर मिळण्यास मदत होईल. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई:-**<br>सदरची योजना खर्चीक असल्यामुळे या प्रस्तवास शासनाकडून मंजूरी मिळण्याची शक्यता कमी आहे. तरी पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्याकडून सविस्तर प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना द्याव्यात. | |

| अ.क्र. | सभासद व घटक कार्यालयाचे नाव | उपस्थित केलेला मुद्दा | **मा. अध्यक्षांचे आदेश/निर्देश** | घटक/कार्यासनाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ७. | श्री. गणेश गोविंद पाटील, सपोशि/१०४७ | राज्य राखीव पोलीस दलातील पोलीस निरीक्षक आणि पोलीस उप निरीक्षक दर्जाच्या अधिकारी यांना राज्य पोलीस दलातील ATS, SID, ACB, CID, या विशेष शाखांमध्ये प्रतिनियुक्तीवर वर संधी मिळणेबाबत. | राज्य राखीव पोलीस दलातून विशेष शाखेमध्ये जाऊ शकतात. विशेष सुरक्षा विभागामध्ये (SPU) अनेक पदे रिक्त आहेत. इच्छूकांनी घटक प्रमुखांच्या मार्फतीने अर्ज सादर करावेत.<br>**मुद्दा निकाली निघाला.** | |
| ८. | श्रीमती जोस्ना गिरी, पोलीस उपनिरीक्षक, नागपूर ग्रामीण. | पोलीस अधिकारी हे अनेकदा एखाद्या गुन्ह्याचा तपास चांगल्या रितीने केल्यामुळे मा. न्यायालयात Conviction होते. परंतु सदर तपासी अधिकारी/ अंमलदार यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट कामासाठी बक्षिस / प्रशंसापत्र दिले जात नाही. | **सहायक पोलीस उपमहानिरीक्षक (आस्थापना), म. राज्य, मुंबई :-**<br>यासाठी EHRMS वर काम चालू आहे. त्यामुळे सर्व अधिकारी यांच्या कामकाजाचा तपशील हा एकाच ठिकाणी दिसू शकेल.<br>**मुद्दा निकाली निघाला.** | |
| ९. | अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई | पोलीस अधिकारी / अंमलदार यांना कोणकोणत्या निकषाच्या आधारे वेगवर्धीत पदोन्नती देता येऊ शकते, याबाबत कोणाला काही सुचवायचे असल्यास सुचविण्यात यावे. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), म. राज्य, मुंबई :-** | **श्री. प्रमोद काळसेकर, पोहवा/ ९८, सिंधुदूर्ग:-**<br>१. ज्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी फक्त मानवी जीवन (नागरीकांचे जीवन) आपले जीवीत धोक्यात घालून त्यांचे प्राण / जीव वाचवीले आहेत किंवा यापुढे या निकषामध्ये जे बसतील त्यांना वेगवर्धीत पदोन्नती देण्यात यावी.<br>२. ज्यांना सर्वोत्कृष्ठ अन्वेषण पुरस्कार (केंद्रीय गृहमंत्री तसेच मा. पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई) मिळाला आहे. त्यांना या निकषानुसार वेगवर्धीत पदोन्नती देण्यात यावी, हि विनंती.<br>३. उत्कृष्ठ पोलीस सेवा पदक ज्यांना प्राप्त झाले आहे असे पोलीस अधिकारी / अंमलदार यांना वेगवर्धीत पदोन्नती दण्यावी. |

## मा. पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांनी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभेच्या संदर्भात दिलेल्या सुचना:-

| अ.क्र. | सूचना | कार्यवाही करणारे संबंधित कार्यासन / घटक |
|---|---|---|
| १. | राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदे प्रामुख्याने १) Grievance Redressal (तक्रार निवारण) आणि २) Police Welfare (पोलीस कल्याण) या दोन प्रमुख घटकांवर आधारित आहे. सदर वृंद परिषदेचे आयोजिन अधिक प्रभावी, प्रातिनिधीक व सुसूत्रीत व्हावे या दृष्टीने सर्व घटक कार्यालयांनी सदर सभेला जास्तीत जास्त प्रतिनिधी उपस्थित राहतील यादृष्टीने प्रत्येक जिल्हयातून पर्यवेक्षण अधिकारी (Supervisory Offiers) दर्जाचे अधिकारी किंवा पोलीस कल्याण निधीचे पोलीस निरीक्षक हे या परिषदेस अनिवार्यपणे उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. | कार्यासन क्रमांक १६. |
| २. | जर एकाच प्रतिनिधीचे अनेक मुद्दे असल्यास, संबंधित प्रतिनिधींशी विचार विनिमय करून त्यांच्या महत्वाच्या ०३ ते ०५ निवडक मुद्द्यांचाच समाविष्ट परिषदेच्या अजेंडयामध्ये करण्यात यावा. | कार्यासन क्रमांक १६. |
| ३. | पोलीस कल्याण निधी अंतर्गत योजना व प्राप्त सूचना यावर सर्वसमावेशक PPT तयार करण्यात यावी. | कार्यासन क्रमांक २८-अ |
| ४. | वृंद परिषदेत उपस्थित केलेल्या मुद्द्यांपैकी जे मुद्दे एखादया विशिष्ट कार्यासनाशी संबंधित नसतील, परंतु या मुख्यालयातील इतर कार्यासनाशी संबंधित असतील, तर अशावेळी संबंधित अधिका-यांनी ते विषय योग्य त्या कार्यासनाकडे तात्काळ वर्ग करून कार्यवाही सुनिश्चित करावी. | सर्व कार्यासन अधिकारी / संबंधित वरिष्ठ अधिकारी |
| ५. | महिला कर्मचा-यांना मिळणा-या दीर्घकालीन रजांविषयी (प्रसुती रजा व बाल संगोपन रजा) असे निदर्शनास आले आहे की, प्रसुती रजेसाठी काही विशिष्ट सोयीस्कर ठिकाणी पोस्टींग घेण्याची प्रवृत्ती दिसून येते; ज्यामुळे संबंधित कार्यालयांवर कामाचा अतिरिक्त ताण येतो. यावर उपाययोजना म्हणून अशा कार्यालयांमध्ये Notional Post (सांकेतिक / कल्पिक पद) तयार करता येईल का, यावर सर्व घटक प्रमुखांनी व्यवहार्य विचार करून आपला प्रस्ताव सादर करावा, जेणेकरून संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर ताण येणार नाही. | सर्व घटक प्रमुख |